**प्रेस नोट दिनांक १४/०४/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे**

**हरविलेली सायकल परत मिळुन दिली.**

आज दि. १४/०४/२०१९ रोजी साततोटी पोलीस चौकीचे बीट मार्शलचे कर्मचारी यांना तिकोने वाईन्सचे बाहेर एक फॅनटम कंपनीची सायकल किंमत अंदाजे ९,०००/- ही लॉक नसलेल्या अवस्थत उभी असलेली दिसली. म्हणुन त्यांनी ती साततोटी पोलीस चौकी येथे आणली. नंतर सदर सायकलबाबत सर्व चौक्यांना फोनद्वारे माहिती देण्यात आली. त्यानंतर शुक्रवार पेठ पोलीस चौकी हद्दीत इसम नामे अमर गुलाबराव गायकवाउ रा. १०५५, बुधवार पेठ, पुणे यांची सायकल सापडत नसल्याची माहिती मिळाली. नमुद इसमास पोलीस पाठवुन साततोटी पोलीस चौकी येथे बोलावुन घेतले. त्यावेळी त्यांनी सदरची सायकल पाहुन ती त्यांचे मुलाची असल्याचे सांगितले. सदर सायकल त्यांची असल्याची खात्री झाल्यानंतर ती त्यांचे ताब्यात देण्यात आली. सदर वेळी सायकल परत मिळाल्याचा त्या परिवारास खुप आनंद झाल व त्यांनी पोलीस दलाचे खुप खुप आभार मानले.

सदर कामगिरी श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली साततोटी पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी पोउपनि लिंगे, पोहवा कर्णे, पोना घोडके, पोना चलसाणी, पोना शिवतरे यांनी केलेली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे